**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात पावासाचा जोर कायम/ पावसामुळे अनेक ठिकाणी मालमत्तेचं नुकसान, आठ जणांचा मृत्यू
- पहलगाम दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या पर्यटकांच्या स्मरणार्थ स्मारक उभारण्याची मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांची घोषणा
- गेल्या आर्थिक वर्षात देशात ८१ अब्ज अमेरिकन डॉलर्सची थेट परकीय गुंतवणूक झाल्याची वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाची माहिती

**आणि**

- परदेशी विद्यार्थ्यांसाठी नवीन व्हिसा मुलाखतींचं वेळापत्रक बंद करण्याचे अमेरिकेचे आदेश

**<><><><><><>**

महाराष्ट्रात गेले तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे प्रचंड नुकसान झालं आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये पावसामुळे आठ जणांचा मृत्यू झाला आहे. पुण्यात तीन, जालना दोन तर मुंबई, रायगड आणि अहिल्यानगर मध्ये प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले. मृतांच्या कुटुंबियांना तात्काळ मदत देण्याचे आणि पिकांच्या नुकसानीची भरपाई देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल झालेल्या मंत्रिमंडळा बैठकीत दिले आहेत.

दरम्यान, महाराष्ट्रातील पावसाळ्याची परिस्थिती अजूनही गंभीर आहे. लातूरमध्ये तीन दिवसांत सरासरी २०६ मिलीमिटर पाऊस पडला, तर अहिल्यानगरमध्ये २०१.२ मिलीमीटर पाऊस पडला. पुरामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे.

महाराष्ट्रात गेल्या २४ तासांत काही ठिकाणी पावसाचा जोर कायम आहे.

**अकोल्यात** काल सुमारे १३० मिलीमिटर पावसाची नोंद झाली. मुसळधार पावसामुळे रस्ते जलमय झाले होते. त्यामुळे अनेक घरात, पाणी शिरलं. साहित्याचे नुकसान झाले. चार ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वाहनांचं नुकसान झालं. शहरात काही भागांत वीज पुरवठा खंडित झाला. पावसामुळे फळबागा, ज्वारी, कांद्यासह अन्य पिकांचं नुकसान झालं आहे.

**नांदेड**मध्ये हदगाव तालुक्यात वरवटी इथं काल ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. पावसामुळे आलेल्या पुरात ३ जण वाहून गेले.

**अहिल्यानगर**मध्ये वालुंबा नदीजवळ अडकलेल्या १५ रहिवाशांना स्थानिक आपत्ती पथकांनी वाचवलं आहे.

**धुळे जिल्ह्यात** आज जोरदार पाऊस झाला आहे. पावसामुळे काही सखल भागात पाणी साचले आहे. हवामान विभागाने जिल्ह्या पुढील तीन तासांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात पावसाचा जोर आज सकाळपासून वाढला आहे. जिल्ह्याला आज रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान राज्यात काही ठिकाणी मात्र पावसानं विश्रांती घेतली आहे.

**रत्नागिरीत** काल रात्रीपासून पावसाचा जोर कमी झाला आहे. जिल्ह्यात वातावरण ढगाळ असून आज आठ दिवसांनी सूर्यदर्शन झालं. लांज्यात गेल्या २४ तासांमध्ये सर्वाधिक ११८ मिलिमीटर पाऊस पडला.

**मुंबई** आणि उपनगरातही पावसानं आज विश्रांती घेतली आहे.

**<><><><><><>**

देशभरात यावर्षी नैऋत्य मोसमी पाऊस सामान्य प्रमाणापेक्षा जास्त पडण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. देशात यंदा नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन लवकर झालं आहे. पुढच्या महिन्यात वायव्य भारतात काही भागांमध्ये तसंच मध्य आणि पूर्व भारतात उष्णतेच्या लाटेची तीव्रता कमी

होण्यी शक्यता आहे. कर्नाटकचा किनारी भाग, केरळ, माहे, नागालँड, मणिपूर, मिझोरम आणि त्रिपुरा इथं काही ठिकाणी पुढचे दोन दिवस मुसळधार पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे. दरम्यान, पश्चिम राजस्थानमध्ये उष्णतेच्या लाटेसारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

**<><><><><><>**

जनता दलाचे खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळं आज इंडोनेशियाची राजधानी जकार्ता इथं पोहोचलं. सिंगापूर, दक्षिण कोरिया आणि जपानमधले त्यांचे कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर, हे शिष्टमंडळ आता ऑपरेशन सिंदूर आणि दहशतवादा विरुद्ध भारताची भूमिका इंडोनेशियच्या नेतृत्वासमोर मांडणार आहे. हे शिष्टमंडळ इंडोनेशिया सरकारचे सदस्य, राजकीय पक्षांचे नेते, आसियानचे सरचिटणीस यांची भेट घेणार आहे.

द्रमुक खासदार कनिमोळी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ काल ग्रीसमध्ये पोहोचलं. ग्रीसचा दौरा संपल्यानंतर हे शिष्टमंडळ ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती देण्यासाठी लाटविया आणि स्पेनला भेट देईल.

शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं काँगोच्या राष्ट्रीय सभेच्या परराष्ट्र व्यवहार समितीचे अध्यक्ष बर्थोल्ड उलुंगू यांची भेट घेतली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ काल दक्षिण आफ्रिकेत पोहचलं.

फ्रान्समध्ये, भाजप खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळानं काल फ्रेंच संसद सदस्यांची भेट घेतली.

काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ पनामाला पोहोचलं आहे.

**<><><><><><>**

पहलगामधल्या दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या २६ पर्यटकांच्या स्मरणार्थ पहलगाम इथं स्मारक उभारण्याची घोषणा जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी केली आहे. पहलगाम इथं काल झालेल्या जम्मू-काश्मीर मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर, जम्मू-काश्मीर सार्वजनिक बांधकाम विभागाला स्मारकाचं काम सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

<><><><><><>

देशात गेल्या आर्थिक वर्षात ८१ अब्ज अमेरिकन डॉलर्सची थेट परकीय गुंतवणूक झाली आहे. आधीच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत ती १४ टक्के अधिक आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनानुसार, यापैकी १९ टक्के गुंतवणूक सेवा क्षेत्रात झाली. तर संगणक सॉफ्टवेअर, हार्डवेअर क्षेत्राला १६ टक्के आणि व्यापार क्षेत्राला ८ टक्के लाभ झाला असल्याचं नमूद केलं आहे. सरकारनं परकीय गुंतवणूकदारांसाठी अनुकूल धोरण लागू केलं आहे, याअंतर्गत बहुतांश क्षेत्रं १०० टक्के एफडीआयसाठी खुली आहेत.

<><><><><><>

परदेशी विद्यार्थ्यांसाठी नवीन व्हिसासाठी मुलाखत घेण्याची प्रक्रिया थांबवावी, असं अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी अमेरिकन दुतावास आणि काऊन्सलर कार्यालयांना सांगितलं आहे. यामुळे अमेरिकेतल्या शाळा, महाविद्यालयात इतर देशातल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यात मर्यादा येणार आहेत. यापूर्वी ट्रम्प प्रशासनानं हावर्ड विद्यापीठाला परदेशातल्या विद्यार्थ्यांची नोंदणी करून घेऊ नये, असं सांगितलं होतं.

<><><><><><>

परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी अमेरिकेचे अंडर सेक्रेटरी जेफ्री केसलर यांची वॉशिंग्टन इथं आज भेट घेतली. दोन्ही देशात महत्त्वाच्या तसंच तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्याबाबत दोघांमधे चर्चा झाली. भारत आणि अमेरिका

यांच्यातले व्यापार संबंध अधिक दृढ व्हावेत यासाठी भारत-अमेरिका धोरणात्मक व्यापार संवाद करण्याबाबतही दोघांमधे चर्चा झाली. विक्रम मिसरी  हे तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर असून ते ट्रम्प प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत.

**<><><><><>**

देशाच्या संरक्षणसाठी सामर्थ्य आवश्यक असून स्वतः सामर्थ्यवान होऊन युद्ध टाळणं हेच योग्य आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं. आपण युद्धासाठी सज्ज असू तरच शांतता प्रस्थापित करणं शक्य असतं, आणि सामर्थ्य केवळ शस्त्रांच्या जोरावर मिळवता येत नाही, जनतेच्या पाठिंब्यावरच सामर्थ्य मिळवता येतं अस धनखड म्हणाले. नवी दिल्ली इथं  राज्यसभा इंटर्नशीप कार्यक्रमाच्या उद्घाटनपर भाषणात ते काल बोलत होते. ऑपरेशन सिंदूरने भारतीयांची मानसिकता बदलली असून आपण याआधी कधीही नव्हतो इतके राष्ट्रवादी झालो आहोत, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. आंतरराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या ६५ व्या आणि ६६ व्या दीक्षांत समारंभाला ते उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून सिक्कीम, पश्चिम बंगाल, बिहार आणि उत्तर प्रदेशच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. सिक्कीम दौऱ्यादरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी  “सिक्कीम@५०: या कार्यक्रमात सहभागी होतील. तसंच राज्यातल्या  अनेक विकास प्रकल्पांची  पायाभरणी आणि उद्घाटनही करतील.

**<><><><><>**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४२ व्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज त्यांना आदरांजली वाहिली. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतलं सावरकरांचं योगदान तसंच त्यांचं अतुलनीय धैर्य आणि संघर्ष, एक कृतज्ञ राष्ट्र म्हणून आपण कधीही विसरू शकत नाही, असं प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या समाजमध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

आंध्र प्रदेशाचे माजी मुख्यमंत्री एन.टी. रामाराव यांनाही त्यांच्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आदरांजली वाहिली.

<><><><><><>

तामिळनाडूमधल्या राज्यसभेच्या चार जागांवरच्या निवडणुकीसाठी द्रविड मुन्नेत्र कळमने चार उमेदवारांची घोषणा केली असून यात अभिनेता आणि मक्कल निधी मय्यम पक्षाचे प्रमुख कमल हासन यांचा समावेश आहे.

<><><><><><>

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत आज कार्लोस अल्काराज, इगा श्वियांतेक आणि अरीना साबालेंका मैदानात उतरतील.

दरम्यान, सर्वाधिक ग्रँडस्लॅम जेतेपदांचा मानकरी असलेला सर्बियाच्या नोव्हाक जोकोविचनं पहिल्या फेरीत अमेरिकेच्या मॅकेन्झी मॅकडोनाल्डचा ६-३, ६-३, ६-३ असा सहज पराभव केला.

//<><><><><><>//